☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट / 340 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 01 / 09 / 2025

# 1)घरफोडी :-

**लोहा :-** दिनांक 27.08.2025 रोजी 14.00 वा. ते दिनांक 30.08.2025 रोजी 15.00 वा. चे दरम्यान, **मौ. बेरळी (खु) ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीचे चुलते प्रभाकर होळगे यांचे दुकानाचे शटरचे लॉक तोडून दुकानात प्रवेश करून दुकानातील डी. एस. कंपनीचे दोन सांऊड सिस्टीमचे टॉप बॉक्स किंमत 1,90,000/-रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी दिपक शिवाजीराव होळगे, वय 27 वर्षे, व्यवसाय टेन्ट व सांऊड सिस्टीम रा. बेरळी (खु) ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 274/2025 कलम 331(3),(4),305 बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/सोनकांबळे, मो.नं.** 9823867336 हे करीत आहेत.

# 2)चोरी :-

**उस्माननगर :-** दिनांक 30.08.2025 रोजी 21.40 वा. चे सुमारास, **मौ. लाडका ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. लवकुश नामदेव राठोड, वय 25 वर्षे, रा. शिराढोण 2. सतिश राजाराम ढाले, वय 29 वर्षे, रा. गोळेगाव 3. राजु भगवान लांडगे, वय 30 वर्षे, रा.सावरगाव 4. एक विधिसंघर्षीत बालक यांनी संगनमत करून यातील फिर्यादीचे आखाडयावरील म्हैशी चोरी करून घेवून जात असताना मिळून आले. वगैरे **फिर्यादी तानाजी शेषेराव शिंदे, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. लाडका ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 224/2025 कलम 303(2),62,3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/851 कुबडे, मो. नं.** 7774845851 हे करीत आहेत.

# 3)जुगार :-

**अर्धापूर :-** दिनांक 31.08.2025 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **मौ.चेनापूर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. बाबुराव घनश्याम लोणे, वय 65 वर्षे, 2. भगवान दत्ता देवकांबळे, वय 59 वर्षे, 3. बालाजी शिवाजी सोळंके, वय 36 वर्षे, 4. दत्ता शिवाजी लोणे, वय 32 वर्षे, 5. शेख चाँद शेख अमिन, वय 62 वर्षे, सर्व रा. चेनापूर हे विना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2800/-रू व जुगाराचे साहित्यासह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/विजय रामराव कदम, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 514/2025 कलम 12 (अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/777 आडे मो.क्रं.** 9923670999 हे करीत आहेत.

# 4)विद्युत शॉक लागुन मृत्यू :-

**कंधार :-** दिनांक 30.08.2025 रोजी 10.30 वा.चे सुमारास, **मौ. वाघदरा शिवार ता. कंधार जि. नांदेड येथे** यातील **मयत नामे गौतम हनमंत मस्के, वय 25 वर्षे, रा. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड**, हा मित्रासोबत वाघदरा पुलावर मासे पकडण्यासाठी गेला असता मासे पकडून परत येत असताना विद्युत शॉक लागून मरण पावला. वगैरे **खबर देणार ज्ञानेश्वर रावसाहेब मस्के, वय 30 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड**, यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. **31/2025** कलम 194 भारतीय नागरीक सुरक्षा संहीता-2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास पोहेकॉ/2308 राठोड, मो.नं.** 9284536640 हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड